

दैनिक अतुल्य महाराष्ट्र

# भक्तिभावाने उजळलेली एक दिव्य वारी !

■ नितीन ढाकणे (आषाढी एकादशी निमित्त विशेष वृत्तांकन)

**टाळांचा गजर, ज्ञानोबा-तुकारामांचा नामघोष, लाल फेट्यांचे वारकरी, डोक्यावर तुळशीवृंदावण घेतलेल्या महिला, आणि विठ्ठलाच्या दर्शनासाठी आसूसलेले हजारो वारकरी - असा हा आषाढी एकादशीचा दिव्य सोहळा महाराष्ट्रभरात उत्साहात साजरा होत आहे. ही फक्त यात्रा नाही, तर हे श्रद्धेचे पर्व आहे. सहस्रात्मांचा उत्सव आहे, आणि समाजसमतेचे प्रतीक आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आणि शेजारच्या राज्यांतून हजारो-लाखो पायी चालत पंढरपूरच्या दिशेने निघालेले वारकरी आज पंढरीत पोहोचले असून, त्यांनी चंद्रभागेत स्नान करून विठुरायाचे दर्शन घेण्यास सुरुवात केली आहे. चंद्रभागेच्या या पवित्र किनार्योवर विठ्ठल नामाचा गजर चालू आहे, गळ्यात तुळशीच्या माळा, हातात टाळ-मृदंग आणि मुखात विठ्ठलाचे नाव घेणारे वारकरी हे सर्व चित्र पंढरपूरच्या वातावरणाला एका वेगळ्याच अध्यात्मिक उंचीवर घेऊन जाते. दिवसाला खूप महत्त्व आहे. वर्षातील २४ एकादशींमध्ये आषाढी आणि कार्तिकी एकादशीला विशेष स्थान आहे. आषाढ महिन्यातील एकादशी म्हणजे देवाची पूजा, वारी आणि भजन-कीर्तनाची पर्वणीच असते.**
**चंद्रभागेत स्नान करून विठुरायाचे दर्शन घेणारा वारकरी या दिवशी पंढरपुरात येऊन देवाचे रूप डोळ्यात साठवून घेतो. आषाढीच्या या दिवशी संपूर्ण पंढरपूर नगरी 'विठ्ठल नामाच्या' गजराने दुमदुमून जाते.**

■ वारी : चालते ती पदयात्रा नाही, तर आस्था, अढळ श्रद्धा आणि आत्मशुद्धीची वाटचाल असते.

## संत ज्ञानेश्वरांचे वारी : एक अमर परंपरा

■ संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचा आषाढी वारीचा प्रवास पंढरपूरकडे निघतो. वारकरी भक्तीत तल्लीन होऊन नाचतात, अभंग गातात आणि ज्ञानोबा-तुकारामांच्या गजराने पंढरपूर दुमदुमून जाते.

## चंद्रभागा

■ भक्तीची साक्ष देणारी ती शांत नदी चंद्रभागा कलेकलेने वाढणारी नदी. पंढरपूरला शांतपणे वेढणारी भीमा नदी - ज्याला आपण प्रेमाने 'चंद्रभागा' म्हणतो - ती पंढरपूरच्या पावन वाळवंटात शांतपणे वाहते. चंद्रभागेच्या काठावर जीवनदायी संस्कार होत असतात.

## वारीच्या इतिहासाची गाथा : एकात्मतेचा दिव्य प्रकाश

■ वारीचा इतिहास जितका जुना आहे, तितकाच तो महान आहे. संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ आणि इतर अनेक संतांनी या वारीची परंपरा चालू ठेवली. संत साहित्याने समाजाला जोडण्याचे काम केले. वारी ही केवळ भक्तिभावाची वाटचाल नाही, तर ती एक सामाजिक क्रांती देखील आहे.

## ■ वारी वारकरी आणि भागवत धर्म -

■ वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध भागांतून सुरू होऊन पंढरपूरकडे येणारा विठ्ठलभक्तांचा सोहळा. वारी हा महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक उत्सव आहे. ही वारी आषाढी आणि कार्तिकी महिन्यांत सुरू होते. आषाढी वारीत विविध संतांच्या पालख्या एकत्र येतात आणि पंढरपूरमध्ये प्रवेश करतात. वारकरी संप्रदायात सर्व जाती-धर्मांचे लोक एकत्र येतात. येथे कोणताही भेदभाव नसतो. सर्व वारकरी विठ्ठलाला आपला मायबाप मानतात. 'विठ्ठल' या नामाचा गजर करत सर्व वारकरी अनवाणी पायांनी चालतात.

## "चंद्रभागे स्नान, तुका मागे हेंचि दान"

- वारीच्या इतिहासाचे प्रमुख कालखंड पुढीलप्रमाणे मानले जातात:
- भक्त पुंडलिकांचा काळ (ज्ञानदेवपूर्व), ज्ञानदेव-नामदेव काळ
- भानुदास-एकनाथ काळ, तुकाराम-निळोबा काळ, तुकारामोत्तर तीनशे वर्षांचा काळ

॥ रामकृष्णहरी ॥

## ■ वारीचा इतिहास

■ संतांचा आत्मा घालतो तिथे : डॉ. सदानंद मोरे म्हणतात "वारी हा केवळ प्रवास नसून, ती वारकऱ्यांच्या जिवाचा ध्यास आहे. ज्ञानोबांनी भक्तीचा आणि ज्ञानाचा पाया रचला, तर तुकारामांनी त्यावर कळस चढवला. वारी ही सामाजिक समतेची आणि बंधुभाव जपणारी चळवळ आहे."

## 'न भूतो न भविष्यति' असा हा सोहळा, ज्यात जातीपातीचा भेद नाही, केवळ भक्तिभावाचा ओघ आहे

## महाराष्ट्राची अध्यात्म, संस्कृती आणि समतेची अखंड परंपरा

■ वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनातील अत्यंत पवित्र परंपरा आहे. दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी एकादशी निमित्त लाखो वारकरी विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पायी चालत पंढरपूरला जातात. ही केवळ पदयात्रा नसून श्रद्धा, समता, सेवा, भक्ती आणि मानवतेचा उत्सव आहे.

■ आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका आणि देहू येथून संत तुकाराम महाराजांच्या पादुका पालखीतून पंढरपूरकडे प्रस्थान करतात. मार्गात हजारो दिंड्या, टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा अखंड जप आणि अभंगांच्या सुरांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय होते.

■ वारकरी संप्रदायात जात, धर्म, श्रीमंती किंवा गरिबी असा कोणताही भेदभाव नाही. प्रत्येक वारकरी समान असून, "राम कृष्ण हरी" आणि "ज्ञानोबा-तुकोबा" या नामस्मरणातून ईश्वरप्राप्तीचा मार्ग स्वीकारला जातो. जो नियमितपणे पंढरपूरची वारी करतो त्याला वारकरी म्हणतात आणि या आचारधर्माला भागवत धर्म असेही संबोधले जाते.

## वारीचा इतिहास :

■ पंढरपूरच्या वारीची परंपरा अत्यंत प्राचीन असून तिचे उल्लेख तेराव्या शतकात आढळतात. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या घराण्यातही वारीची परंपरा होती. ज्ञानेश्वर महाराजांनी भागवत धर्माचा संदेश देत सर्व समाजघटकांना एकत्र आणले आणि वारीला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप दिले. पुढे संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, शंकरस्वामी शिऊरकर महाराज, मल्लप्पा वासकर यांसारख्या संतांनी ही परंपरा अधिक दृढ केली. वारकरी संप्रदायाचे मूळ प्रेरणास्थान भक्त पुंडलिक मानले जाते. त्यांच्या भक्तीमुळेच भगवान विठ्ठल पंढरपूरात विटेवर उभे राहिल्याची श्रद्धा आहे.

■ **वारीचे महत्त्व :** वारी म्हणजे केवळ पायी प्रवास नव्हे, तर जीवनाला योग्य दिशा देणारा संस्कार आहे. यात भक्ती, शिस्त, सेवा, समता, सहकार्य आणि मानवतेचा संदेश दिला जातो. "पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान आणि विठोबाचे दर्शन" ही प्रत्येक वारकऱ्याची आयुष्यभराची इच्छा असते. म्हणूनच लाखो भाविक वर्षानुवर्षे कोणताही खंड न पडू देता वारीत सहभागी होतात. वारी ही महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, सामाजिक एकात्मतेचा आणि अखंड भक्तीभावाचा जिवंत वारसा असून, ती प्रत्येकाच्या मनात श्रद्धा, समता आणि प्रेमाची ज्योत प्रज्वलित करणारी महान परंपरा आहे.

## संपादकीय

### 'किंग ऑफ द नॉर्थ'पर्व

ब्रिटनच्या राजकारणात नेतृत्वबदल झाला असून, लेबर पार्टीने अँडी बर्नहॅम यांच्याकडे पंतप्रधानपदाची जबाबदारी सोपवली आहे. कीर स्टार्मर यांच्या नेतृत्वावरील नाराजीनंतर झालेला हा बदल पक्षाच्या नव्या दिशेचा संकेत मानला जात आहे. दिल्लीत 'कॉकरॉच पार्टी'च्या गदारोळाची चर्चा सुरू असताना एका महत्त्वाच्या राजकीय घडामोडीकडे वृत्तपत्रांचे तुलनेने कमी लक्ष गेले. ती घटना म्हणजे ब्रिटनच्या पंतप्रधानपदी अँडी बर्नहॅम यांची झालेली निवड. ५६ वर्षीय अँडी बर्नहॅम हे ब्रिटनचे पंतप्रधान बनलेले गेल्या दशकातील सातवे नेते ठरले. ब्रिटनच्या घटनात्मक व्यवस्थेनुसार प्रत्येक वेळी सार्वत्रिक निवडणूक घेऊनच पंतप्रधान बदलण्याची आवश्यकता नसते. सत्ताधारी पक्षाकडे बहुमत कायम असेल, तर पक्षांतर्गत बदलातूनही नवा नेता निवडला जाऊ शकतो. लेबर पार्टीकडे संसदेत बहुमत होते; मात्र पंतप्रधान कीर स्टार्मर यांचा पक्षातील संसदीय सहकाऱ्यांचा पाठिंबा हळूहळू कमी होत गेला. पक्षांतर्गत नाराजी वाढल्याने अखेर स्टार्मर यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला आणि त्यांच्या जागी अँडी बर्नहॅम यांची निवड झाली. मात्र हा केवळ नेतृत्वबदल नव्हता. स्टार्मर यांच्या काही धोरणात्मक निर्णयांमुळे लेबर पार्टीचा जनाधार कमी होत असल्याची भावना पक्षातील अनेक नेत्यांमध्ये निर्माण झाली होती. त्यांच्या कार्यकाळातील अनेक निर्णयांवर टीका झाली आणि पक्षातील अनेक राजकारण्यांचा त्यांच्यावरील विश्वास डळमळीत झाला. याच पार्श्वभूमीवर अँडी बर्नहॅम यांची निवड ही लेबर पार्टीमध्ये नव्या दिशेचा प्रयत्न म्हणून पाहिली जात आहे. अर्थात, बर्नहॅम यांची पंतप्रधानपदी झालेली निवड ही सहजसाध्य नव्हती. 'किंग ऑफ द नॉर्थ' म्हणून ओळखले जाणारे बर्नहॅम हे गेल्या चार वर्षांतील ब्रिटनचे पाचवे पंतप्रधान आहे. मात्र, त्यांच्यासमोर असलेली आव्हाने अत्यंत व्यापक आणि गंभीर आहेत. बर्नहॅम यांच्यासमोरील प्रमुख आव्हान म्हणजे देशाची ठप्प झालेली अर्थव्यवस्था. 'स्टॅग्नंट इकॉनॉमी' म्हणजे अशी अवस्था, ज्यामध्ये आर्थिक विकासाचा वेग अत्यंत मंदावतो. अशा परिस्थितीत नवीन रोजगारनिर्मिती कमी होते आणि नागरिकांच्या जीवनमानावर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. ब्रिटनमध्ये २००८ पासून सुरू असलेल्या या आर्थिक अडचणींमुळे अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. बर्नहॅम यांच्यासमोर अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देणे, रोजगाराच्या संधी वाढवणे आणि नागरिकांचा विश्वास पुन्हा मिळवणे हे महत्त्वाचे आव्हान आहे. ब्रिटनमधील नागरिक वाढत्या करांच्या ओझ्यापासून दिलासा मागत आहेत. त्यामुळे नव्या नेतृत्वासमोर कर धोरण आणि अर्थव्यवस्थेला स्थैर्य देण्याचे मोठे आव्हान आहे. सध्या ब्रिटनची अर्थव्यवस्था मंदावलेली आहे. उत्पन्नातील वाढती दरी, बाजारपेठांवरील दबाव आणि जीवनमानातील घसरण या समस्या सरकारसमोर उभ्या आहेत. या आव्हानांना बर्नहॅम यांना प्रभावीपणे सामोरे जावे लागेल. नागरिकांचे खालावलेले जीवनमान सुधारायचे आहे, मात्र त्याच वेळी प्रमुख कर वाढवण्याचे टाळण्याचे कठीण संतुलन साधावे लागणार आहे. अमेरिकेच्या भूमिकेचे केवळ अनुकरण न करता पश्चिम आशिया आणि युक्रेन युद्धासारख्या मुद्द्यांवर स्वतंत्र आणि स्पष्ट भूमिका घेण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असेल. याशिवाय ब्रिटनमधील राजकीय अस्थिरता संपवून देशाला स्थिर सरकार देणे हे त्यांच्यासाठी सर्वात मोठे आव्हान आहे. गेल्या दशकात ब्रिटनने सात पंतप्रधान पाहिले आहेत. त्यामुळे केवळ क्षमायाचना करण्यापेक्षा नागरिकांना सरकारकडून तातडीने आणि ठोस परिणामांची अपेक्षा आहे. सरकारमध्ये विकेंद्रीकरण आणण्याची गरज बर्नहॅम यांनी ओळखली आहे. स्थानिक पातळीवर अधिकारांचे हस्तांतरण आणि प्रशासन अधिक प्रभावी बनवणे हे त्यांच्या पुढील धोरणातील महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. स्टार्मर यांच्या सरकारसमोर जी आव्हाने होती, त्याच प्रकारची आव्हाने बर्नहॅम यांच्यासमोरही आहे. मंद अर्थव्यवस्था, वाढता जीवनावश्यक खर्च आणि ताणलेली सार्वजनिक सेवा व्यवस्था. या सर्व समस्यांवर ठोस उपाय शोधणे आवश्यक आहे. पश्चिम आशिया आणि युक्रेन युद्धासंदर्भातील धोरणात्मक गोंधळ दूर करून स्पष्ट दिशा देणेही त्यांना गरजेचे आहे.

# आषाढी एकादशी निमित्त दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलमध्ये दिंडी सोहळा व वेशभूषा स्पर्धेचे आयोजन

**परळी (प्रतिनिधी)**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल, परळी वैजनाथ येथे इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी पारंपरिक दिंडी सोहळा व वेशभूषा स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. भारतीय संस्कृती, संत परंपरा आणि वारकरी संप्रदायाची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, तसेच त्यांच्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांची जोपासना व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे प्राचार्य मा. श्री.श्रीकांत पाटील सर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी विद्यार्थी,



पालक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, विठ्ठल-रुक्मिणी, वारकरी, टाळकरी, मृदंगवादक अशा विविध पारंपरिक वेशभूषा साकारून उपस्थितांची मने जिंकली.

दिंडीमध्ये "ज्ञानोबा-तुकाराम", "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल" अशा जयघोषांनी परिसर भक्तिमय झाला. टाळ-मृदंगाच्या गजरात विद्यार्थ्यांनी पारंपरिक फुगड्या, अभंग आणि भजनांच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाचा उत्साह अनुभवला.

विद्यार्थ्यांच्या आकर्षक वेशभूषा, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि सांस्कृतिक जाणीवेचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले.यावेळी प्राचार्य मा. श्री. श्रीकांत पाटील यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व,संतांच्या विचारांचे आचरण आणि भारतीय संस्कृतीचे जतन करण्याचा संदेश दिला.

सदरील कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत मा.श्री.किरण गित्ते साहेब (आय.ए.एस.) मुख्यमंत्री सचिव : सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, उद्योग व वाणिज्य विभाग, त्रिपुरा सरकार, विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते मॅडम व शाळेचे प्राचार्य मा.श्री.श्रीकांत पाटील सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच त्यांनी सर्वांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छाही दिल्या.याप्रसंगी शिक्षक, पालक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी, प्रेरणादायी आणि संस्कारक्षम ठरला.

# भगवान विद्यालयाची वारकरी दिंडी उत्साहात संपन्न

**लक्ष्मण राठोड व श्रावणी प्रभाळे या विद्यार्थ्यांनी केलेल्या विठ्ठल व रुक्मिणीच्या वेशभूषेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले**





**परळी / प्रतिनिधी**

येथील भगवान प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांची आषाढी वारी निमित्त काढण्यात आलेली वारकरी दिंडी उत्साहात संपन्न झाली. हि दिंडी काढण्यामागे संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती भाग्यश्री कराड व सचिव प्रियाताई कराड यांची संकल्पना व मुख्याध्यापक लिंबाजी दहिफळे यांची प्रेरणा होती.

सकाळी ठिक ९ वाजता शाळेच्या प्रांगणातून या दिंडीला प्रारंभ झाला विठ्ठल नामाचा गजर व ज्ञानोबा माऊली तुकाराम नामाच्या जयघोषाने शालेय परिसर दुमदुमून गेला होता. त्यामुळे शालेय परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांनी केलेल्या विठ्ठल,रुक्मिणी सह विविध संत,वारकऱ्यांच्या आकर्षक वेशभूषेने गल्लीतील नागरीकांचे लक्ष वेधून घेतले. शाळेतील इयत्ता चौथीच्या वर्गातील विद्यार्थी चि.लक्ष्मण राठोड यांने विठ्ठलाची तर कु.श्रावणी प्रभाळे हिने रुक्मिणीची वेशभूषा परिधान केली होती. ती सर्वांचे आकर्षण ठरली.

टाळ, मृदंगाच्या जयघोषाने व मुलींच्या हातातील विठ्ठल,रुक्मिणीच्या मूर्ती ,डोक्यावरील तुळशी व भगव्या पताकांच्यामुळे वातावरण भक्तीमय झाले होते.यावेळी विद्यार्थ्यांमध्ये मोठा जोष व उत्साह दिसून आला. विद्यार्थ्यांनी पावले व फुगडी खेळण्याचाआनंद घेतला.

दिंडी पाहाण्यासाठी गल्लीतील नागरिक मोठ्या संख्येने दिंडी मार्गावर उपस्थित होते. प्रत्येकजण आपापल्या मोबाईल मध्ये दिंडीचे छायाचित्रे काढत होता.महिला मातांनी ठिकठिकाणी विठ्ठल व रुक्मिणी मातेचे पादुका पुजन व औक्षण करून दिंडीचे स्वागत केले.प्रियानगर येथील हनुमान मंदिरासमोरील प्रांगणात गोल रिंगण सोहळा पार पडला या रिंगण सोहळ्यात गल्लीतील महिला भजनी मंडळ सहभागी झाले होते. यानंतर दिंडीतील विद्यार्थी व शिक्षक यांना खाऊचे वाटप करण्यात आले. दिंडीला शाळेत परत येण्यास ११ वाजले.जवळपास दिंडी दोन तास चालली हि वारकरी दिंडी यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सांस्कृतिक विभागाचे प्रमुख बंडू अघाव यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील जेष्ठ शिक्षक अनंत मुंडे,दत्तात्रय तिडके,राजेश विभुते,सुनील चव्हाण,सचिन गवळी,श्रीमती सिंधू सोनवणे, संघमित्रा वाघमारे यांनी अथक परिश्रम घेतले.







**अशीही विठ्ठल भक्ती...**

परळी-आषाढी एकादशी, या दरम्यान होणारी पंढरपुरची वारी हे सर्व काही अतुलनीय असते. यामध्ये मोठ्या व्यक्ती सहभागी होतातच. परंतू लहान मुलांनाही वारीमधील वेशभूषेचा मोह आवरला जात नाही. परळीच्या सुर्वेश्वरनगर येथील कु.गार्गी राहुल पाचनकर या चिमुकलीने छोट्या महिला वारकर्याची भूमिका साकारली असून आकर्षक वेशभूषा तुळशी वृंदांवनातील विठ्ठल रुक्माई, श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ, टाळ आणि तिच्या चेहर्यावरील हावभाव आषाढी वारीतील एकाग्रता स्पष्ट करते. (छायाचित्र : संतोष जुजगर, परळी वैजनाथ)

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नविन पनवेल भाजप मंडलाचे रक्तदान शिबिर उत्साहात

**पनवेल (प्रतिनिधी)**

महाराष्ट्राचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल भाजप मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर मोठ्या उत्साहात आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेत पार पडले. समाजहिताचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिक आणि भाजप कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले. न्यू पनवेल कर्नाटक संघ हॉल येथे आयोजित या शिबिराला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील तसेच सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, एकनाथ गायकवाड, समीर ठाकूर, संतोष शेट्टी, शशिकांत शेळके, नगरसेविका कविता चौतमोल, सीता पाटील, राजेश्री वावेकर, यावेळी आयोजक नवीन पनवेल भाजप मंडळाचे अध्यक्ष तथा दशरथ म्हात्रे यांनी सर्वांचे स्वागत व आभार मानले.

# देवेंद्र फडणवीस–पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त स्वच्छता मोहीम व शालेय साहित्य वाटप

**जनकल्याणासाठी देवाभाऊ आणि पंकजाताईंना शतायुष लाभो : राजेश गित्ते**

**परळी (प्रतिनिधी)**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी, परळी तालुक्याच्या वतीने 22 ते 26 जुलै या कालावधीत विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत शुक्रवार (24 जुलै) रोजी जिल्हा परिषद शाळा, दादाहरी वडगाव (ता. परळी वैजनाथ) येथे स्वच्छता मोहीम तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला ग्रामस्थ, विद्यार्थी आणि भाजप पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी बोलताना भाजप तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री पंकजा मुंडे यांचे नेतृत्व दूरदृष्टीचे असून, राज्यातील सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी ते सातत्याने कार्यरत असल्याचे सांगितले. प्रभू वैद्यनाथ यांच्या चरणी दोन्ही नेत्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभावे, अशी प्रार्थना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमात भाजप तालुका उपाध्यक्ष तथा माजी पंचायत समिती सदस्य भरतराव सोनवणे यांनीही मनोगत व्यक्त करून समाजहिताच्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. या प्रसंगी माजी पंचायत समिती सदस्य मारोतराव फड, सरपंच शिवाजी कुकर, उपसरपंच प्रकाश यमगर, भाजप सचिव अनिल गुट्टे, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष धुराजी साबळे, भाजप नेते माऊली आंधळे, भाऊसाहेब गित्ते, ग्रामपंचायत सदस्य भगवान सातपुते, सुदर्शन मुंडे, राजेभाऊ मुंडे, दत्ता होळकर, जनार्धन मुंडे, शालेय समिती अध्यक्ष संजय व्यवहारे, मुख्याध्यापक हरिश्चंद्र राजळे, शिक्षकवृंद, पदाधिकारी, बूथ प्रमुख, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थ्यांनी मंत्री पंकजा मुंडे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. दरम्यान, वाढदिवसानिमित्त आयोजित सामाजिक उपक्रमांच्या मालिकेत आज वारकरी बांधवांना फराळ आणि फळांचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.



# वैद्यकीय व सर्व परीक्षा पद्धती पारदर्शक करा : अँड. रमेश जंजिरे

**प्रतिनिधी - सोपान पगारे**

आष्टी तालुक्यातील वाहिरा येथील संत शिरोमणी शेख महंमद महाराजांच्या दरबारात मुक्ताई बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने नीट, इंजिनिअरिंग व इतर क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी अँड. रमेश जंजिरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी सरपंच संभाजी गाडे होते. गुणगौरव झालेल्या विद्यार्थ्यांची नावे: जयदीप श्रीकृष्ण बोंद्रे, साक्षी संतोष पांडुळे, शुभांगी सुधीर पवार, प्रांजल जगदीश आटोळे, अंजली संतोष झांजे, वैष्णवी बिबीशन झांजे, प्रेम दादासाहेब झांजे, ओम सुनील आटोळे, प्रथमेश नवनाथ झांजे, प्रतीक अर्जुन जेधे.

**"परीक्षा पद्धती पारदर्शक हवी"**

यावेळी बोलताना अँड. जंजिरे म्हणाले, "आज नीट, जेई, टीईटी सारख्या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचा कस लागतो. मात्र पेपरफुटी आणि आर्थिक व्यवहारांमुळे या पवित्र पद्धती दूषित होत आहेत. शासनाने परीक्षा पद्धतीत पारदर्शकता आणून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा. विद्यादान हे सर्वश्रेष्ठ दान आहे, ते जर दूषित झाले तर पुढची पिढी कशी घडणार?"

ग्रामीण भागातील विद्यार्थी क्लासेसशिवाय जिल्हा परिषदेच्या शाळेतून संघर्ष करून यश मिळवतात हे कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रा. दादासाहेब झांजे, संचालक पांडुरंग गावडे, उपसरपंच भाऊसाहेब झांजे, माजी सरपंच अण्णासाहेब आटोळे, प्रा. सिताराम झांजे, प्रा. संजय झांजे, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ .ग्रामपंचायत सदस्य सुरेश झांजे, ग्रामपंचायत सदस्य देविदास तोटे, प्रा. सिताराम झांजे, प्राध्यापक संजय झांजे, प्रा. दीपक शेला,र ग्राम रोजगार सेवक फक्कड झांजे, संतोष पांडुळे सर .दादासाहेब बळीराम झांजे ,माजी सरपंच सोपानराव झांजे ,श्रीकृष्ण बोंद्रे. बिबीशन झांजे. बाप्पू भानुदास झांजे ,शिवाजी पाटील झांजे, अर्जुन जेधे, सुनील रंगनाथ आटोळे, ज्ञानदेव झांजे, कोरडे मॅडम, बबन काळे, वैजयंता पवार, प्रतिभा आटोळे,किसन मेटे, अशोक नामदेव झांजे, अंकुश मारुती झांजे ,बापू भानुदास झांजे, भाऊसाहेब आजिनाथ झांजे, दादासाहेब रंगनाथ झांजे, दगडू काळे, बाजीगर हगारे आदी ग्रामस्थ उपस्थीत होते कार्यक्रमाचे आयोजन मुक्ताई बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने केले होते.



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



## पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त
# परळीत सामाजिक सेवेचा उत्सव; शालेय साहित्य, टिफीन बॅग वाटप आणि वृक्षारोपणाचे उपक्रम

### ॲड. प्रणव मराठे यांचा पुढाकार; विद्यार्थी, बालके आणि पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य

**परळी / प्रतिनिधी**–

महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा भाजपच्या ज्येष्ठ नेत्या ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळी शहरात विविध सामाजिक सेवा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षण, बालकल्याण आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमांचे आयोजन भाजपा नगरसेवक ॲड. प्रणव प्रकाश मराठे (अध्यक्ष, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठान) यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे.

या उपक्रमांना भाजपाचे ज्येष्ठ नेते जुगलकिशोर लोहिया, शहराध्यक्षा उमाताई चंद्रकांत समशेट्टे, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सेठ सामत, युवा नेते निळकंठ चाटे, परळी नगर परिषदेचे बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, सभापती अंजलीताई केशवराव माळी, सभापती योगेश मेनकुदळे, ज्येष्ठ नगरसेविका जयश्रीताई मोगरकर, नगरसेविका अश्विनीताई राहुल केंद्रे, डॉ. पूजाताई प्रितेश तोतला, मीराताई केशव नागरगोजे आणि वंदनाताई अश्विन आघाव यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

आज शनिवार, दि. 25 जुलै 2026 रोजी सकाळी ८ वाजता सरस्वती विद्यालय, परळी वैजनाथ येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी 10 वाजता प्रभाग क्र. 9 येथील अंगणवाडीत लहान बालकांना टिफीन बॅग व डब्यांचे वितरण करण्यात येईल.

त्यानंतर रविवार, दि. 26 जुलै 2026 रोजी सकाळी 10 वाजता सिद्धार्थ नगर, सुभाष चौक येथे वृक्षारोपण व वृक्षवाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या सामाजिक सेवा उपक्रमांमध्ये ज्येष्ठ नेते, पक्षाचे पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख, महिला आघाडीचे पदाधिकारी, विविध आघाड्यांचे कार्यकर्ते तसेच शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन भाजपा नगरसेवक ॲड. प्रणव मराठे यांनी केले आहे.

# 'मोर्चाला गालबोट लावल्यास समारंभपूर्वक पाहुणचार करू

**मुंबई |** नीट पेपरफुटी आणि दिल्लीतील विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ राज आणि उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, या दोन्ही नेत्यांच्या नेतृत्त्वाखाली रविवारी मुंबईत एक भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या नियोजनासाठी राज ठाकरे यांनी शनिवारी त्यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी शहराध्यक्ष, सर्व विभागप्रमुख आणि पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वाची बैठक बोलावली आहे. तसेच सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत त्यांनी 'या मोर्चाला गालबोट लावण्याचा कोणताही प्रयत्न करू नये,' असा स्पष्ट इशाराही दिला आहे.



राज ठाकरे यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले की, येत्या 26 जुलैला NEET परीक्षेतील गोंधळ, त्याबद्दल विद्यार्थ्यांचं सुरु असलेलं आंदोलन आणि ते आंदोलन चिरडण्याचा सरकारचा सुरु असलेला प्रयत्न याविरोधात आपण 'तिरंगा मार्च' काढत आहोत. त्याबद्दल तुम्हाला आपल्या दोन्ही पक्षाच्या नेत्यांकडून, मध्यवर्ती कार्यालयांकडून सूचित करण्यात आलं असेलच.

हा 'तिरंगा मार्च' हा दिल्लीतलं सरकार आणि त्यांच्या आदेशानुसार दिल्लीतील पोलीस जी मुजोरी दाखवत आहेत याचा निषेध करण्यासाठी आहे. तसंच हा मोर्चा जे विद्यार्थी सरकारला अजिबात न जुमानता ठामपणे उभे आहेत त्यांच्यासाठी, त्यांच्या घरच्यांसाठी आणि जे दिल्लीला जाऊ शकत नाहीत किंवा मुंबईला येऊन निषेध व्यक्त करू शकत नाहीत त्यांना तुमच्या पाठीशी संपूर्ण महाराष्ट्र उभा आहे हे दाखवण्यासाठी असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले.

राज ठाकरे म्हणाले, हा 'तिरंगा मार्च' आहे. हा पूर्णपणे अराजकीय आहे, इथे कुठल्याही पक्षाचा झेंडा नसेल, दोन्ही पक्षाच्या नेत्यांच्या समर्थनाच्या घोषणा नसतील. सरकारचा निषेध असेल, आणि देशभरातील विद्यार्थ्यांना आणि तरुण तरुणींना आपण जो पाठिंबा दर्शवत आहोत त्यासाठीच्या घोषणा असतील. मोर्च्याचे निमंत्रक मी आणि उद्धव असलो तरी आमच्याही नावाने कुणी घोषणा द्यायच्या नाहीत. हा विद्यार्थ्यांचा मोर्चा आहे याचं भान आपण बाळगायचं आहे आणि ते तुम्ही बाळगालच याबद्दल तिळमात्र शंका नाही.

मोर्च्याला गालबोट लावण्याची हिंमत कोणी करणार नाही

बाकी मोर्च्याला गालबोट लावण्याची हिंमत कोणी करणार नाही, कारण आपण काय करू शकतो याचा अंदाज सगळ्यांनाच आहे. पण तरीही काही उत्साही असतात. ते आले आणि काही वेडंवाकडं करायचा प्रयत्न केला, काही चुकीच्या घोषणा देऊन वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न जरी केला किंवा तिथे आलेल्या पालकांना (खासकरून महिलांना आणि मुलींना) जर त्रास देण्याचा प्रयत्न केला तर त्यांना, जवळ जे कोण पोलीस असतील त्यांच्या ताब्यात 'समारंभपूर्वक' द्या. ते कसं हे मी तुम्हाला वेगळं सांगायची गरज नाही. पण पोलीस जिथे नसतील, तिथे अशांचा 'पाहुणचार' कसा करायचा याचा अनुभव आणि मनगटातील शक्ती दोन्ही आपल्याकडे आहेच, असेही राज ठाकरे म्हणाले.

महाराष्ट्रातील पोलिस आपल्यासोबत आहेत

पुढे राज ठाकरे म्हणाले, बाकी महाराष्ट्र सैनिकांनी आणि शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने या हे सांगायची गरजच नाही. ते तुम्ही येणारच. पण जास्तीत जास्त विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना पण घेऊन या, त्यांची मोर्च्यात काळजी घ्या आणि ते पुन्हा सुखरूप घरी जातील हे पहा. बाकी सरकारचं माहित नाही पण महाराष्ट्रातील पोलीस हे आपल्यासोबत आहेत कारण त्यांच्यासमोर पण मुलाबाळांच्या आयुष्याचा पण प्रश्न आ वासून उभा आहे.

बाकी कुठे भेटायचं किती वाजता भेटायचं याचा तपशील तुमच्याकडे आहेच. तेंव्हा 26 जुलैला 'तिरंगा मार्च' ला भेटूया. सर्वांनी सकाळी 10 वाजता शिवाजी पार्क येथील शिवछत्रपतींच्या पुतळ्या जवळ जमायचं आहे ! आम्ही आपली , विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या पालकांची वाट बघतोय ! जनतेच्या मनातील संताप काय आहे हे या शांततापूर्ण मोर्चाने दिल्लीश्वरांना दाखवून देऊया, असेही राज ठाकरे म्हणाले.

# चित्रकला स्पर्धेत आलिशा संघईचे चित्र ठरले लक्षवेधी






**परळी (प्रतिनिधी)**


परळी शहरात भाजपाच्या वतीने घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत कु.अलिशा गजेंद्र संघई या विद्यार्थीनीने पाणी बचतीचा संदेश देणारे साकारलेले चित्र लक्षवेधी ठरले.या चित्राचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शहरातील विद्यावर्धीनी विद्यालयाची विद्यार्थिनी अलिशा गजेंद्र संघई हीने दि.२२ जुलै रोजी श्रध्दा मंगल कार्यालयात पार पडलेल्या चित्रकला स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.यावेळी तीने सध्या भेडसावत असलेल्या पाणी प्रश्नावर बोलके चित्र साकाराना वृक्षाच्या रुपाने माता कडेवर पाण्याचा हंडा आणि बादली आणि त्यात वृक्षाचे रोपटे मानवी शिशुच्या नाभीतुन निघालेले दाखविले आहे.चित्रावर पाणी वाचवा चे संदेश देत चित्राकडे लक्ष वेधले आहे.कु.अलिशा हीने यापुर्वी म.रा.वीज निर्मिती कंपनीने घेतलेल्या चित्रकला स्पर्धेत प्रथम,पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त गतवर्षीच्या चित्रकला स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावलेला आहे.तिच्या या चित्राचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## वसंतराव नाईक जयंती निमित्त परळीत सोमवारी महत्वपूर्ण बैठक

**परळी | प्रतिनिधी**

हरित क्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक यांची जयंती निमित्त परळी येथे बंजारा समाजातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीचे सोमवारी आयोजन करण्यात आले आहे.



सिरसाळा येथे 31 जुलै रोजी हरित क्रांतीचे प्रणेते राज्याचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले वसंतराव नाईक यांची भव्य स्वरूपात जयंती साजरी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी बंजारा समाजातील प्रत्येक तांड्यावरील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. परळी येथील जिजामाता उद्यानात सोमवारी ता. 27 जुलै रोजी दुपारी एक वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस तालुक्यातील प्रत्येक तांड्यावरील प्रमुख कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचे नियोजन करावे असे आवाहन वसंतराव नाईक जयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## फडणवीसांच्या दिल्लीवारीच्या चर्चांवर अमृता फडणवीसांचा खुलासा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पक्षश्रेष्ठी दिल्लीत महत्त्वाची जबाबदारी देणार असल्याच्या चर्चांना त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी पूर्णविराम दिला आहे. पंढरपूर दौऱ्यादरम्यान प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी, "मला महाराष्ट्रातच राहायचं आहे आणि देवेंद्रजींनाही महाराष्ट्रातच ठेवणार," असे स्पष्ट सांगितले. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय चर्चांवर त्यांनी थेट भूमिका मांडली.

यावेळी अमृता फडणवीस यांनी NEET पेपरफुटी प्रकरणावरही प्रतिक्रिया दिली. विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी सुरू असलेले आंदोलन योग्य असल्याचे सांगत त्यांनी, सरकारने या प्रकरणात फास्ट ट्रॅक कोर्ट, कठोर शिक्षा आणि भविष्यात पेपरफुटी रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुरू केल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांची मेहनत वाया जाऊ नये आणि त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठी सरकार गंभीर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यावर स्वागतार्ह भूमिका

रविवारी मुंबईत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर संयुक्त मोर्चाची हाक दिली आहे. या राजकीय समीकरणावर भाष्य करताना अमृता फडणवीस यांनी अत्यंत सकारात्मक भूमिका घेतली. त्या म्हणाल्या, "इतके दिवस वेगळे असलेले ठाकरे बंधू आता एकत्र येऊन काहीतरी करत आहेत, ही नक्कीच चांगली गोष्ट आहे. त्यांच्या या एकत्र येण्याकडे आपण सर्वांनी एका सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे."

'नीट' आंदोलनाला पाठिंबा अन् सरकारची बाजू

जंतरमंतर आणि राज्यभरात सुरू असलेल्या 'नीट' विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरही त्यांनी मत व्यक्त केले. जोपर्यंत हे आंदोलन केवळ 'नीट' पेपरफुटीच्या मुद्द्यावर आहे, तोपर्यंत ते पूर्णपणे योग्य असल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र, विद्यार्थ्यांच्या पाठीशी सरकार भक्कमपणे उभे असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. "सरकार पडद्यामागे यावर गांभीर्याने काम करत होते, ज्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. या प्रकरणासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना करणे आणि शिक्षेच्या तरतुदी कठोर करणे यांसारखे मोठे बदल केले.





## दिल्लीच्या जंतर-मंतरवरील आंदोलनाचे पडसाद महागावात; काँग्रेसकडून रास्ता रोको

**महागाव | प्रतिनिधी :**

दिल्ली येथील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या आंदोलनाचे पडसाद महागाव शहरात उमटले. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक यांच्या नेतृत्वाखाली तसेच कॉम्रेड डी. बी. नाईक यांच्या सह या आंदोलनाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी शासनाच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या या वेळी शिक्षणमंत्र्याच्या राजीनाम्याची मागणी, च्या पोलिसांनी लाठीमार केला त्यांना निलंबनाची मागणी करण्यात आली तर विविध तीव्र संतापाच्या पोष्टरांमुळे या आंदोलनाकडे लक्ष केंद्रित झाले तर यावेळी

रास्ता रोकोमुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक तालुका अध्यक्ष सुनील राठोड वन मला ताई राठोड भगवान खंडागळे कुणाल नाईक स्वप्नील नाईक यांच्यासह काँग्रेसचे तळागाळातील पदाधिकारी कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी होते तर यांच्यासह

ॲड.. कॉ. डी.बी. नाईक, मा.सभापती पं.स.,काँ. देविदास मोहकर, मा.जि.प.सदस्य यवतमाळ,काँ. पांडुरंग मुडे, अध्यक्ष किसान सभा महागांव,काँ. दत्तराव खंदारे, उपाध्यक्ष किसान सभा यांचीही फौज उपस्थित होती आंदोलनकर्त्यांना पोलीस प्रशासनाणें ताब्यात घेतली .

## धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा झाल्याशिवाय शांत बसणार नाही

मुंबई | नीट (NEET) पेपरफुटी प्रकरणावरून देशभरात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी शिवसेना (ठाकरे गट)चे नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहत केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी करत त्यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला राजकीय रंग न देता त्यांच्या हक्काच्या लढ्याला पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

"हे व्यासपीठ विद्यार्थ्यांचे आहे"

भाषणाच्या सुरुवातीलाच आदित्य ठाकरे यांनी हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाचे नसून विद्यार्थ्यांचे असल्याचे स्पष्ट केले. "आम्ही येथे तुमच्यासोबत उभे आहोत, जेणेकरून आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना कुणी हात लावू शकणार नाही. हे व्यासपीठ आमचं नाही, हे आंदोलनही आमचं नाही. कदाचित तुम्ही आम्हाला मतदानही करत नसाल, पण तो तुमचा लोकशाही अधिकार आहे. मतभेद असू शकतात, मात्र विरोध करण्याचा प्रत्येकाचा अधिकार आम्ही नेहमीच मान्य करू," असे ते म्हणाले.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, शनिवार, 25 जुलै 2026
Last page




# आषाढी एकादशी निमित्त दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलमध्ये दिंडी सोहळा व वेशभूषा स्पर्धेचे आयोजन



**परळी | प्रतिनिधी**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल, परळी वैजनाथ येथे इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी पारंपरिक दिंडी सोहळा व वेशभूषा स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. भारतीय संस्कृती, संत परंपरा आणि वारकरी संप्रदायाची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, तसेच त्यांच्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांची जोपासना व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे प्राचार्य मा. श्री. श्रीकांत पाटील सर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, विठ्ठल-रुक्मिणी, वारकरी, टाळकरी, मृदंगवादक अशा विविध पारंपरिक वेशभूषा साकारून उपस्थितांची मने जिंकली.

दिंडीमध्ये "ज्ञानोबा-तुकाराम", "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल" अशा जयघोषांनी परिसर भक्तिमय झाला. टाळ-मृदंगाच्या गजरात विद्यार्थ्यांनी पारंपरिक फुगड्या, अभंग आणि भजनांच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाचा उत्साह अनुभवला. विद्यार्थ्यांच्या आकर्षक वेशभूषा, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि सांस्कृतिक जाणीवेचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले.यावेळी प्राचार्य मा. श्री. श्रीकांत पाटील यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व,संतांच्या विचारांचे आचरण आणि भारतीय संस्कृतीचे जतन करण्याचा संदेश दिला.

सदरील कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत मा.श्री.किरण गित्ते साहेब (आय.ए.एस.) मुख्यमंत्री सचिव : सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, उद्योग व वाणिज्य विभाग, त्रिपुरा सरकार, विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते मॅडम व शाळेचे प्राचार्य मा.श्री.श्रीकांत पाटील सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच त्यांनी सर्वांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छाही दिल्या.याप्रसंगी शिक्षक, पालक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी, प्रेरणादायी आणि संस्कारक्षम ठरला.



**श्री क्षेत्र गहिनीनाथ गड दिंडीच्या वारकऱ्यांसाठी भव्य महापंगत**

# आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांच्यावतीने सेवाभावाची परंपरा कायम

**आष्टी (प्रतिनिधी)**

आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला श्री क्षेत्र गहिनीनाथ गड ते पंढरपूर पायी दिंडी पंढरपुरात दाखल झाल्यानंतर वारकरी भाविकांसाठी दरवर्षीप्रमाणे भव्य महापंगतीचे आयोजन आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश (अण्णा) धस यांच्या वतीने करण्यात आले. या महापंगतीत हजारो वारकरी भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला.

महापंगतीपूर्वी श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह.भ.प. विठ्ठल महाराज यांचे आशीर्वाद घेण्यात आले. तसेच अन्नपूर्णा देवीचे पूजन करून महापंगतीस प्रारंभ करण्यात आला. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात आणि भक्तिमय वातावरणात हा सेवाभावी उपक्रम अत्यंत उत्साहात व भक्तिभावाने पार पडला.

वारकरी संप्रदायातील सेवा, समता, भक्ती आणि मानवतेचा संदेश जपणारी ही परंपरा समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. हजारो वारकरी भाविकांची सेवा करण्याचे भाग्य लाभणे ही मोठी पुण्याई असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

आषाढी एकादशीच्या आदल्या दिवशी दरवर्षी आयोजित केली जाणारी ही महापंगत वारकरी संप्रदायातील सेवाभावाची जपलेली पवित्र परंपरा असून, या माध्यमातून दूरदूरवरून पायी आलेल्या वारकऱ्यांना प्रेमाने भोजन प्रसाद देऊन त्यांच्या सेवेत सहभागी होण्याचा उपक्रम अनेक वर्षांपासून सातत्याने राबविला जात आहे.



# डॉ.आनंद सानप यांना महा ॲक्युपंक्चर रत्न 2026 प्रदान...



**सिन्नर (प्रतिनिधी)**

येथील निसर्गोपचार व ॲक्युपंक्चर तज्ञ तसेच सिन्नर तालुका वैद्यकीय व्यावसायिक सेवाभावी संस्थेचे उपाध्यक्ष ,सामाजिक कार्यकर्ते डॉ. आनंद रेवजी सानप यांना नुकताच " महा ॲक्युपंचरत्न 2026 " पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन यांच्या वतीने दिनांक १९ जुलै २०२६ रोजी छत्रपती संभाजी नगर येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथील आयोजित शानदार कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले.आरोग्य क्षेत्रातील उत्कृष्ट रुग्णसेवा,समाजसेवा याची दखल घेत डॉ.आनंद सानप यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मराठी सिने कलावंत सुयोग गोरे त्यांचे पिताश्री प्रसिद्ध ॲक्युपंक्चर तज्ञ डॉ.राजेंद्र गोरे,आयुषचे पदाधिकारी बाबुराव कानडे,डॉ. अभिजित कवठकर,विजयनवल पाटील डॉ.नितीनराजे पाटील, ॲड.दत्तात्रय जाधव,नागेश सोनने,दिशा चव्हाण,तुषार वाघुळदे,प्रशांत सावंत आदी उपस्थित होते.पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ.सानप यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.